# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शहादा यांचे कार्यालय

**क्रमांक/फौजदारी/कावि/ 260/2020** **दिनांक-03/07/2020**

वाचा : -

1. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) व (3)
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कम 30,33,34,41,56,63 व कलम 51
3. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951
4. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक करोना-2020/प्रक्र.58/आरोग्य दि.13/03/2020
5. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1987 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली दि.14/03/2020
6. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक महसूल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन, मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना डीएमयु/2020 /सी आर-92 दि.24.3.2020
7. मा.सचिव (गृह) भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्रमांक 40-3/2020-डीएम(ए) दि.24/03/2020
8. म.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडील कार्यालयीन मनाई आदेश (फौ.प्र.सं.1973 चे कलम 144) आदेश क्रमांक 2020/कक्ष-2/ड-2/पीओएल/कावि/254 दि.23/03/2020
9. म.जिल्हाधिकारी नंदुरबार यांचेकडील कार्यालयीन शुध्दीपत्रक क्रमाक/2020/कक्ष-2/पीओएल/कावि-255 दि.24/03/2020
10. म.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नंदुरबार यांचेकडील आदेश क्रमांक कक्ष/कोरोना विषाणु/70/2020 दि.26/03/2020
11. मा.मुख्य सचिव, महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचेकडील इंग्रजी अधिसुचना क्रमांक डीएमय/2020/सी आर 92/DisM-1 दि.13/04/2020
12. मा.सचिव (गृह) भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडीलआदेश क्रमांक 40-3/2020 डीएम-I (A) दि.15/04/2020

आदेश-

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 दिनांक- 13 एप्रिल 2020 पासुन लागु केला असुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. तसेच कोरोना विषाणु प्रसार प्रतिबंधासाठी शासनाने मागील काही काळापासुन लॉक डाऊन जाहीर केले आहे.

शहादा तालुक्यात दिनांक-03/07/2020 रोजी 8 व्यक्तीची कोरोना (कोव्हीड-19) टेस्ट पॉझिटिव्ह आली आहे. त्यातील शहादा शहरातील नगरपालीका हद्दीतील कल्पना नगर, वृंदावन नगर, श्रीकृष्ण कॉलनी या भागातील 3 रूग्ण असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी, शहादा शहर व तालुक्यात कोरोना विषाणु (कोव्हीड-19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन सदर विषाणुची लागण एका संक्रमीत रुग्णाकडुन अन्य व्यक्ती/ इसमास होण्याची शक्यता विचारात घेता उपोदघोतातील अनुक्रमांक 10 अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन **मी, चेतन गिरासे उपविभागीय दंडाधिकारी शहादा तथा इंन्सीडेंट कमांडर याव्दारे आदेशीत करतो की,** शहादा शहारातील नगरपालिका हद्दीतील **कल्पना नगर, वृंदावन नगर, श्रीकृष्ण कॉलनी** व त्या लगतचे परिसरास प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment Zone) व त्यास लागुन असलेल्या क्षेत्रास बफर झोन म्हणुन घोषित करण्यात येत आहे. सदर प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment Zone) मध्ये खालील परिसराचा समावेश असेल.

| अ.क्र. | क्षेत्र | प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment Zone) मधील परिसर |
|---|---|---|
| 1 | प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment Zone) | कल्पनानगर, वृंदावन नगर, श्रीकृष्ण कॉलनी |

| अ.क्र. | क्षेत्र | प्रतिबंधात्मक क्षेत्र (Containment Zone) |
|---|---|---|
| 1. | बफर झोन (Buffer Zone) | स्वामी समर्थ मंदीर परिसर, मोहीदा चौफुली परिसर, पटेल रेसीडेंन्सी परिसर, बस स्थानक, स्टेट बँक चौक व परिसर, दोंडाईचा रोड प्रवेशव्दारा पर्यंतचा परिसर, प्रेस मारूती मंदीर परिसर. |

* सदर प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे सुचना लागु राहतील.

1) प्रतिबंधात्मक क्षेत्रामधुन (Containment Zone) कोणालाही ये-जा करता नाही. तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना ये-जा करण्यास प्रतिबंध असेल. तसेच सदर प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये अत्यावश्यक सेवा (वैद्यकिय सेवेसह) सुरळीत सुरू राहण्यास मुभा राहील. परंतु सदर क्षेत्रात अत्यावश्यक सेवा पुरवण्यासाठी संबंधीतांची तपासणी करणे बंधनकारक राहील.

2) संबंधीत क्षेत्राला (Containment Zone) जोडणाऱ्या रस्त्यांवर पोलीस चेक पोष्ट उभारण्यात यावे.

3) अत्यावश्यक सेवांसाठी नियमीत ये-जा करण्यासाठी व्यक्तींना व वाहनांना पास/ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात यावे. व त्याबाबतच्या सर्व नोंद ठेवुन सर्व संबंधीतांना कळविण्यात यावे.

4) सदर प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये शासकीय कामकाज चालु राहण्यास प्रतिबंध नसेल.

5) सदर प्रतिबंधात्मक क्षेत्रामधील येण्या-जाण्याच्या मुख्य ठिकाणी (Entry & Exit Points) उष्म चाचणी (Thermal Screening) करणे आवश्यक राहील. तसेच याठिकाणी नेमण्यात आलेल्या आरोग्य सेवकांनी ये-जा करणा-या सर्वांची छाननी (Screening) करावे. त्यामध्ये मुलाखत घेणे तापमान मोजणे,जाण्याच्या ठिकाणाची व त्याठिकाणी राहण्याची कालावधी आणि त्याच्या पत्याची नोंद घेणे इत्यादी.

6) तसेच सबंधीत क्षेत्रातील वास्तव्यास असलेल्या नागरीकांना कोरोना विषाणुचा प्रसार रोखण्याच्या उपाययोजना बाबत प्रबोधन करण्यात यावे.

7) प्रतिबंधात्मक क्षेत्रातील बाहेर जाणाऱ्या अत्यावश्यक सेवेतील (Essential/Emergency Services) सर्व लोकांची नोंद ठेवण्यात येऊन Integrated Disease Surveillance Programme (IDSP) नुसार कार्यवाही करण्यात यावी.

8) या क्षेत्रातुन बाहेर येणाऱ्या सर्व वाहनांची Sodium Hypochlorite (1%) मिश्रणाने निर्जंतुकीकरण करणे आवश्यक राहील.

9) सदरहु अत्यावश्यक सेवा पुरवठा करतांना Social Distancing चे व इतर आरोग्य विषयक नियमांचे पालन करण्याची व्यवस्था करण्यात यावी.

10) सदर आदेशाचा भंग केल्यास संबंधीतांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

उपविभागीय दंडाधिकारी शहादा, भाग-शहादा

(चेतन गिरासे)
**उपविभागीय दंडाधिकारी शहादा तथा**
**इंन्सीडेंट कमांडर, शहादा**

प्रत-
1. म.जिल्हाधिकारी सो.नंदुरबार तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नंदुरबार
2. म.पोलीस अधिक्षक सो नंदुरबार
3. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार
4. जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.नंदुरबार
5. जिल्हा शल्यचिकीत्सक नंदुरबार
6. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नंदुरबार
7. जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार यांचेकडेस प्रसिध्दीकामी रवाना
8. उपविभागीय पोलीस अधिकारी शहादा
9. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शहादा
10. तालुका आरोग्य अधिकारी, शहादा
11. पोलीस निरीक्षक शहादा/सारंगखेडा/म्हसावद
12. गट विकास अधिकारी पंचायत समिती शहादा
13. मुख्याधिकारी, नगरपरिषद शहादा
14. इतर सर्व संबंधीत

स्वा/xxx

(चेतन गिरासे)
**उपविभागीय दंडाधिकारी शहादा तथा**
**इंन्सीडेंट कमांडर, शहादा**